# फौजदारी किरकोळ अर्ज नं. ३६/२०२६

## नि. क्र. ०१ वरील आदेश

**( अरूण भिवा कुडाळकर वि.महाराष्ट्र सरकार)**

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ अन्वये दाखल केलेला आहे. आजरोजी अर्जदार याने नि.०९ कडे अर्ज देवून सदरचा अर्ज त्यांनी अर्जदार यांचे मालकीचे दुकान अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत सील करण्यात आलेले ते दुकान डी.सील करण्यासाठी दाखल केलेला होता. परंतु सदर गुन्हयाचे कामी दोषारोपपत्र दाखल करणेत आलेले आहे. सदरचा गुन्हा हा मा.जिल्हा व सत्र न्यायालय सिंधुदुर्ग–ओरोस यांचेसमोर चालणारा आहे. तरी सदरचा अर्ज मागे घेण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे. त्यामुळे अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज यापुढे चालवायचा नसल्याचे सदर निशाणी ९ वरील अर्जामध्ये नमूद असल्याचे दिसून येत आहे. अर्जदार याने अर्जात नमुद केलेले कारण पाहता सदरचा अर्ज प्रलंबित ठेवणे न्यायोचित दिसून येत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

–::– **आदेश** –::–

अर्जदार याने नि.०९ कडे दाखल केलेल्या अर्जानुसार प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

सही/–

दिनांक–०२.०७.२०२६.

(जी.ए.कुलकर्णी ),
न्यायदंडाधिकारी, वर्ग–१ कुडाळ.